आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२६ एप्रिल २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देशभरातल्या ५१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप
- मुंबईत झालेल्या २६/११च्या दहशतवादी हल्ल्यामध्ये कोणताही सहभाग नसल्याचा तहव्वूर राणाचा दावा
- पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी सशुल्क स्मशानभूमी तयार करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

**आणि**

- चंदन तस्करीप्रकरणी बीडमध्ये ८ जणांना अटक

**<><><><><>**

देशातले तरुण आपल्या कठोर परिश्रम आणि नवनवीन उपक्रमांमधून राष्ट्र किती सक्षम आहे हे जगाला दाखवून देत आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारांहून अधिक तरुणांना दूरस्थ पद्धतीनं आज मोदी यांनी नियुक्ती पत्रं वाटली, त्यानंतर ते बोलत होते.

अर्थसंकल्पात सरकारनं उत्पादन अभियानाची घोषणा केली असून त्याचं उद्दिष्ट ‘मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणं, देशातल्या तरुणांना जागतिक दर्जाची उत्पादनं बनवण्याची संधी देणं हे असून यामुळे लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसंच, लघु उद्योजकांना चालना मिळेल त्याचबरोबर देशभरात रोजगाराच्या नवीन संधीही खुल्या होतील, असं त्यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या प्रगतीत महिलांचं योगदान अतिशय महत्त्वाचं असल्याचा पुनरुच्चारही प्रधानमंत्र्यांनी केला. ते म्हणाले,

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

मुंबईत येत्या १ ते ४ मे दरम्यान होणाऱ्या वेव्ह्ज २०२५ परिषदेचाही उल्लेख त्यांनी केला. या परिषदेमुळे डिजिटल कंटेंट क्षेत्राच्या भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

१५ वा रोजगार मेळा आज देशभरातल्या  ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. आज निवड आणि भरती झालेले कर्मचारी महसूल विभाग, कार्मिक आणि सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्ती वेतन मंत्रालय, गृह मंत्रालय, टपाल विभाग, उच्च शिक्षण विभाग, रेल्वे मंत्रालय, कामगार आणि रोजगार मंत्रालय यासारखी विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये सामील होणार आहेत.

मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचं वाटप झालं. आपण सर्वांनी एकत्र येऊन देशाच्या कल्याणासाठी काम केलं तर देश निःसंशयपणे सुरक्षित हातात असेल आणि कोणतीही शक्ती आपल्याला विकसित भारत होण्यापासून रोखू शकत नाही, असं पियूष गोयल या कार्यक्रमात म्हणाले. आयकर विभागानं मुंबईत यशवंतराव चव्हाण केंद्रात रोजगार मेळाव्याअंतर्गत नियुक्तीपत्र वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावेळी २५ जणांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तीपत्रं वितरित केली.

पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्‌डा, केंद्रीय नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचं वाटप करण्यात आलं. प्रधानमंत्री मोदी यांनी या देशातल्या तरुणांच्या हाताला काम देण्याचं काम केलं असून दहा लाखापेक्षाही अधिक सरकारी नोकऱ्या त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत आणि याचा नक्कीच फायदा या तरुण वर्गाला होईल, असं मत नड्‌डा यांनी व्यक्त केलं. नागपूरमध्येही रोजगार मेळावा झाला.

**<><><><><>**

देशात पावणेदोन लाख आयुष्मान आरोग्य मंदिरं बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असून मोठ्या प्रमाणात जगाला डॉक्टर्स आणि वैद्यकीय कर्मचारी पुरविण्याचा निर्धार केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज पुण्यात व्यक्त केला. सिंबायोसिस रुग्णालय संशोधन केंद्रात नेफ्रोलॉजी आणि युरोलॉजी केंद्राचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

<><><><><>

जम्मू काश्मीरमधील पहेलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे यांच्या घरी आज भेट देवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं. आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिलात त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावं , राज्यशासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी त्यांना धीर दिला.

केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनीही जगदाळे कुटुंबाची भेट घेतली.

<><><><><>

पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये भारत नवनवीन जागतिक मापदंड स्थापित करत असून पोलाद क्षेत्राच्या वाढत्या ताकदीमुळे हे शक्य झालं आहे, असं केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी किशन रेड्डी यांनी सांगितलं. ते आज मुंबईत इंडिया स्टील २०२५ आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत बोलत होते.

पोलाद क्षेत्रात कच्च्या मालाच्या लवचिकतेसाठी जागतिक भागीदारी, चक्रीय अर्थव्यवस्था तसंच संशोधन आणि विकास हे तीन प्रमुख आधारस्तंभ असल्याचं असं केंद्रीय पोलाद राज्यमंत्री भूपती राजू श्रीनिवास वर्मा यांनी सांगितलं .

<><><><><>

मुंबई २६/११च्या दहशतवादी हल्ल्यामध्ये आपला कोणत्याही प्रकारे सहभाग असल्याचं आरोपी तहव्वूर राणाने नाकारलं आहे. पाकिस्तान लष्कराच्या वैद्यकीय पथकात असलेल्या राणाने लष्कर-ए-तय्यबाच्या वतीने हल्ल्याच्या जागांची रेकी

केल्याची माहिती या घटनेतला एक आरोपी डेव्हिड हेडली याने आधी दिली होती. राणाचे अमेरिकेतून हस्तांतरण झाल्यानंतर दिल्लीत राष्ट्रीय सुरक्षा संस्था त्याची कसून चौकशी करत आहे. ही चौकशी म्हणजे हल्ल्यापूर्वी लष्कर-ए तय्यबा आणि पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेने ही योजना आखताना केलेल्या कामाच्या चौकशीचा एक भाग आहे.

**<><><><><>**

राज्यात पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी सशुल्क स्मशानभूमी तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यासाठी नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी जागा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश सरकारने दिले आहेत.

**<><><><><>**

बीड पोलिसांनी आज चंदन तस्करी प्रकरणी आठ आरोपींना अटक केली. तस्करीची माहिती समजल्यानंतर सौताडा शिवारातील जामखेड रोड, वंजारा फाटा इथं सापळा रचून या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं. या आरोपींकडून चंदनासह इतर साहित्य असा एकूण ४ लाख ६९ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात जत इथल्या आश्रमशाळेच्या सात विद्यार्थिनींचे मुख्याध्यापकानं लैंगिक शोषण केल्याची घटना माध्यमातून समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने याप्रकरणी तातडीनं गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करण्याचे निर्देश सांगली पोलिसांना दिले आहेत. या घटनेची चौकशी शासनाच्या समाज कल्याण आणि महिला बाल विकास विभागाकडून सुरू असून त्याचा अहवाल ही आयोगास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**<><><><><>**

मुंबईत अंधेरी इथं लोखंडवाला संकुलात काल मध्यरात्री लागलेल्या आगीत एका महिलेचा मृत्यू झाला तर अन्य ६ जण जखमी झाले. आगीमुळे हानी पोचलेल्या सात जणांना रुग्णालयात दाखल केलं असता यातल्या एका ३४ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला तर इतर जखमींवर उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर 'मन-की-बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १२१ वा भाग असेल. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून मन-की-बात या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार आहे. रात्री ८ वाजता विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येईल.

**<><><><><>**

नाशिक इथल्या  सार्वजनिक वाचनालयाचे माजी अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते मधुकर झेंडे यांचं आज पहाटे निधन झालं. ते ८८ वर्षाचे होते. महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम बघितलं. त्यानंतर त्यांनी अखिल भारतीय नाट्य परिषदेतही ते कार्यरत होते.  नाशिकच्या सुमारे ७० वर्षांची वाटचाल मुखोद्गत असलेले झेंडे हे 'नाशिकचा संदर्भकोश'म्हणूनदेखील ओळखले जायचे. दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत कोकणातली पहिली रेल्वे आज दुपारी रत्नागिरी रेल्वेस्थानकावरून अयोध्येला रवाना झाली. सुमारे ८०० लाभार्थी या रेल्वेतून अयोध्येला गेले असून, ही रेल्वे एक मे रोजी रत्नागिरीमध्ये  परत येणार आहे.
दरम्यान,  धुळे जिल्ह्यातून देखील आज  ८०० पात्र लाभार्थी जेष्ठ नागरीक या योजनेअंतर्गत धुळे रेल्वे स्थानकावरुन अयोध्याला रवाना झाले.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात आज अवकाळी पावसानं  पुन्हा एकदा हजेरी लावली. या पावसामुळे झाडांवर लगडलेल्या आंब्यांचं  नुकसान झालं आहे. तर दुसरीकडे गर्मीमुळे हैराण झालेल्या नागरिकांना मात्र मोठा दिलासा मिळाला असल्याचं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान शस्त्र विभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी गार पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये उद्या ऑरेंज अलर्ट आहे. इथं जोरदार वारे आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात कोकणातलं  हवामान कोरडं राहण्याचा अंदाजही व्यक्त झाला आहे.

**//<><><><><>//**